दिलें आहे. अशा प्रकारें सदाचार, सत्संग, ज्ञानी भजनात्मक भक्ति व निष्काम कर्मयोग हे भागवत् धर्माच्या ऋत उपासनेचे मुख्य आधारस्तंभ आहेत.

संसार असार आहे असें भागवत धर्म मानीत नाही. भागवत धर्माचें ध्येय जें ऋताची उपासना तें संसार सोडल्यानें सर्वसंग परित्याग केल्यानें विशेष सुलभ रीतीनें साध्य होतें असें कांहीं भागवत धर्माला वाटत नाहीं. ऋत हें सर्वव्यापी आहे. तें संसारांत आहे, समाजांत आहे. व्यक्तींत आहे सर्व प्राणिमात्रांत आहे. या सर्वांची उपासना म्हणजे ऋत उपासना. या सर्वांची सेवा म्हणजे ऋताची सेवा. संसार त्याज्य, अध्यात्ममार्गांतील एक धोंड म्हणून तो असताना त्यांतून निवृत्त होऊन जंगलाचा आश्रय करणें म्हणजे ऋताच्या कार्याला विरोध करणें होय. कारण जगाचें पालनपोषण करणें हें एक ऋताचें कार्य आहे. संसारांत राहून आपली अध्यात्मिक उन्नती करतां करता इतरांच्याही उन्नतीला साहाय्यभूत होणें म्हणजे ऋताच्या कार्याला हातभार लावणें होय. संसार सोडून पळून जाणें यात स्वार्थ व भित्रेपणा आहे. इतरांच्याकडे, समाजाकडे दुर्लक्ष करून आपली स्वताचीच अध्यात्मिक उन्नती करून घेणें हें इतर भुकेले व अर्धपोटीं असतां तिकडे दुर्लक्ष करून आपल्या एकट्याचा तेवढा तळिराम गार करण्याइतकें स्वार्थी आहे. आपल्या बरोबर इतरानाही निदान चतकोर भाकरी खाऊ घालणें हें ऋताच्या उपासनेच्या दृष्टीनें श्रेष्ठ आहे. शारीरिक संन्यास घेतल्याने मानसिक संन्यास साधला असें होत नाहीं व शारीरिक वा इंद्रियदृष्ट्या संसार केल्यानें मानसिक संन्यास साध्य होत नाहीं असें नाहीं. मानसिक संन्यास साध्य झाल्याखेरीज अध्यात्मिक प्रगति होऊं शकणार नाहीं. शरीर संसारांत असलें तरी मन अध्यात्मांत वावरत राहू शकते हें एकनाथ, तुकाराम आदीं संतांच्या चरित्रावरून स्पष्ट होते. शरीर जगलात पण मन गावभर फिरते असा संन्यास काय उपयोगी ? संसारांत परमार्थ साधतां येतो व परमार्थ करताना संसारही करतां येतो. हें भागवतधर्मीय संतांनीं सिद्ध करून दिलें आहे. दुसरें असें कीं, जे ज्ञाते आहेत, जे अध्यात्मांत उच्च पातळीवर आहेत त्यांनीं आपल्या ज्ञानाचा मातेच्या वात्सल्यानें समाजासाठीं उपयोग केला नाहीं, त्याला मार्गदर्शन केलें नाहीं तर आईविना असलेल्या बालकाप्रमाणें समाजाची स्थिति होईल. जाणते ज्ञाते असे लोक समाजाला सोडून दिले तर मग समाजानें कोणाच्या तोंडाकडे पहावें ? दुसरें असें कीं, संसारांत राहिल्यानें, बायका--मुलात वावरल्यानें, समाजांत फिरल्यानें षड्रीपु मागें लागतात व त्यामुळें अध्यात्मिक उन्नतीला अडथळा येतो म्हणून त्यांना भिऊन पलायन करणें चांगलें कीं निधड्या छातीनें त्यांच्याशीं सामना करून त्यांना जिंकून आत्मसात करणें चांगलें ? जितेंद्रिय म्हणविणाऱ्या महाभागांनीं असल्या गोष्टींना कां भ्यावें असा भागवत धर्मांचा सवाल आहे. समुद्रांत शार्क आदी धोकादायक मासे वा बर्फाचे डोंगर असतात म्हणून का बोटीपडावांनीं जलपर्यटन सोडून द्यावें ? जीवनांत

शत्रू व धोके असणारच. त्याशिवाय जीवनाला चव नाहीं, मिठाविना स्वयंपाक हा काय स्वयंपाक म्हणावयाचा ? तो बेचवच. तसेंच संसाराचें व तसेंच जीवनाचें. संसारांत असलांत काय, जंगलांत गेलात काय, समाजांत फिरलांत काय किंवा दुसऱ्या कशांतही वावरलांत काय माणूस हा निधड्या छातीचा, वीर वृत्तीचा व धैर्याचा असला तर तो आपली उन्नति करूं शकतो. अध्यात्मांत पळकुटे बाजीराव उपयोगी होत नाहींत. तर दृढनिश्चयावर निष्ठेनें खडे राहणारे तानाजी बाजी उपयोगी पडतात. ज्या ऋताची आपण उपासना करतो त्याच्याशीं आपण एकनिष्ठ राहिलें पाहिजे. त्याचें कार्य करताना येणाऱ्या संकटांना, अडीअडचणींना घाबरून पळून जाणें योग्य होणार नाहीं. ऋताने निर्माण केलेला सोन्यासारखा संसार सोडण्या-पेक्षां अध्यात्म शिकण्याचें तें एक साधन म्हणुन त्याचा उपयोग करून निष्काम कर्मयोगचा वा अनासक्ति योगाचा प्रायोगिक व औपत्तिक अभ्यास करून अध्या-त्मातील एक एक परीक्षा देत देत पी. एच. डी होणें अधिक चांगलें—earn while you learn व learn while you earn हें प्राप्त परिस्थितींतुन वर येऊन वैभवाच्या शिखरावर जाण्याचें श्रेष्ठ साधन आहे. म्हणुन भागवत धर्मानें संसारांत परमार्थ व परमार्थांत संसार याचा पुरस्कार केला आहे.

नरदेह निंद्य आहे. घाणीचें आगर आहे. ज्याला अध्यात्मिक उन्नति साधा-वयाची असेल त्यानें त्याकडे दुर्लक्ष केलें पाहिजे. त्याची उपेक्षा केली पाहिजे, असें एक मत प्रचलीत आहे. ही गोष्ट भागवत धर्माला मान्य नाहीं. कारण असें करणें हें मूळ जे ऋत त्याच्याशीं विसंगत आहे. अनंत कोटी पुण्यें पदरीं असलीं तर नरदेह प्राप्त होतो असें आपला धर्मच सांगतो. हें खरें असलें तर नरदेह प्राप्त होणें हें मोठें भाग्यच म्हणावयाचें आणि अशा या भाग्याला दुर्भाग्याच्या मोलानें वागविणें हे अनत कोटी पापांचें फळच आहे म्हणावयाचे. स्वतःचा, समाजाचा वा जगाचा भाग्योदय करून घेण्याचे नरदेह हें एक साधन आहे. मानवी शरीराची जी रचना आहे ती तशी आहे म्हणून आज मानवाची सर्व प्रकारें सुधारणा होत आहे. मानवी शरीराला हात–होटें नसती व शरीरांत अंतःकरण व मनबुद्धि नसती तर मानवाची आज जी कांहीं उन्नति झाली आहे ती झाली नसती. अशा प्रकारें ऐहिक काय किंवा पारमार्थिक काय उन्नति करून घेण्याचें व सुखसाधनें मिळविण्याचें नरदेह हें एक मौल्यवान साधन आहे. यामुळें तो निंद्य वा त्याज्य मानण्याचें कांहींच कारण नाहीं. शरीराचे फाजील चोचले करूं नयेत हें ठीक. परंतु आरोग्यदृष्ट्या, अध्यात्मिकदृष्ट्या व साधनदृष्ट्या त्याची योग्य जोपासना करणें व निगा राखणें अत्यंत आवश्यक आहे.

देवानें दिलेल्या शरिराची निष्काळजीपणामुळें अगर अपेक्षेमुळें नासधुस होऊं देणें हा देवाघरीं गुन्हा आहे. कारण ज्या ऋताची उपासना करावयाची तें ऋत मानवी शरिरातहि आहे. शरिराच्या मध्यस्थिनें हें ऋत आपलें सामर्थ्य व्यक्त करीत असतें. विजेला व्यक्त व्हायला ग्लोब हें साधन आहे. तोच जर मळका काळाबेंद्रा असला तर विजेचें व्यक्तरूप प्रकाश हाही तसाच असणार. यदाकदाचित शरिरामुळें कांहीं आड-काठी उत्पन्न होत असल्या तर त्या नाहींशा करण्याचा उपाय शरिराची उपेक्षा हा नव्हे. गालावर बसलेला डास मारण्यासाठीं दिलेली थप्पड गालाला मारक होणारच. तद्वत शरिराच्या केलेल्या हेळसांडीमुळें ऋताच्याहि कार्याला अडथळा होणारच. हें ऋत उपासनेशीं विसंगत आहे म्हणून शरीर हें निंद्य, त्याज्य आहे असें भागवतधर्मानीत नाहीं.

जग मिथ्या आहे, भ्रम आहे, खोटें आहे. त्याला अस्तित्वच नाहीं. म्हणून त्याच्या नादी लागण्यात अर्थ नाहीं. त्याकडे दुर्लक्ष करावें. अशा प्रकारची निराशवादी विचारसरणी भागवत धर्मात नाहीं. भागवत धर्म आशावादी आहे. जग हें मिथ्या नसून ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणें तें वस्तुप्रभा आहे. मूळ जें सत्य अव्यक्त त्याची प्रभा म्हणजे हें जग. वस्तू व प्रभा यांच्यांत जें नातें आहे तें नातें अव्यक्त व व्यक्तांत आहे. प्रभा ही वस्तू नव्हे हें सत्य असलें तरी त्यावरून तिची प्रभा असत्य आहे भ्रम आहे असें कांहीं म्हणतां येत नाहीं. एखाद्या वृक्षाची छाया पडली असतां जर एखादा कोणी म्हणेल कीं छायाच नाहीं. ती दृष्टीचा भ्रम आहे तर तें सत्य नव्हे, तसेंच छाया म्हणजेच वृक्ष हेंही सत्य नव्हे, कांहीं कारणनें छाया हीं वृक्षाने धारण केलेलें दुसरें रूप आहे. वृक्षाचे गुणधर्म छायेंत नाहीत हें खरें असलें तरी छायाच नाहीं हें मात्र खरें नाहीं. छायेकडे पाहून वृक्षाची सर्वसाधारण कल्पना आपण करूं शकतों. छायेवरून वृक्षाची वा पर्वताची बरोबर उंची गणितशास्त्र सांगूं शकतें, तसेंच अव्यक्ताचें व्यक्तरूप जें हें विश्व त्याच्यावरून अव्यक्ताची त्याच्या सामर्थ्याची आपण कल्पना करूं शकतों. वृक्षाच्या उंचीचा अंदाज बांधायला जशी छाया उपयोगी पडते तसेंच हें विश्व अव्यक्ताचें ज्ञान मिळविण्यास उपयोगी पडतें. यास्तव त्याचा त्याग न करतां, त्याकडे दुर्लक्ष न करतां त्यांतील हरेक गोष्टीचा होईल तेवढा उपयोग करून अव्यक्ताचे ऋताचें मिळेल तेवढें ज्ञान मिळविणें श्रेयस्कर होय. छायेमुळें मानवी जीवनाला जें सुख मिळतें तें सुख कोणी छाया खरी नाहीं, ती वृक्ष नाहीं असें म्हणून दूर करूं लागला तर काय आपण त्याला शहाण्यांत काढूं कीं वेड्यांत काढूं ? तसेंच या विश्वापासून मिळणाऱ्या सात्विक सुखाचा लाभ घेणें शहाणपणाचें ठरेल कीं वेडेपणाचें ? सुख आत्मोन्नतिकारक असावें

म्हणजे झालें. विश्वांतून सुख व आनंद टिपून घेणें हें एक प्रकारें ऋताचेंच कार्य आहे. ऋत स्वतां आनंद आहे. यामुळें आपण आनंद मिळविल्यास स्वठायींच्या ऋतास व पर्यायानें विश्व ऋतास फुलविल्यासारखें आहे, त्याच्या कार्याचा विस्तार केल्यासारखें आहे. बाहुला बाहुलीचें लग्न वा भातुकली मिथ्या संसार असला तरी त्याच्याच आधारें मुली संसाराचे धडे शिकत असतात व तत्संबंधीं त्यांच्या भावना फुलत असतात. कोणताहि खेळ मिथ्याच आहे. म्हणून कांहीं जगानें खेळ सोडले नाहींत. सर्व जगच खेळ खेळत आहे. खेळतांना कोणीहि तो मिथ्या समजून कसंतरी करीत नाहीं, खरं समजूनच हिरहिरीनें खेळत असतात व अशा खेळ खेळूनच नाना गुण पैदा करीत असतात. ऋताकडे जाण्याचा रस्ता या मिथ्यांतूनच गेलेला आहे. जग हें माया, मिथ्या कीं भ्रम याचा काथ्या कुटत न बसतां आज जें कांहीं आपल्या इंद्रियांना जें दिसतें ऐकूं येतें व समजतें तें खरें समजून ऋताच्या कार्यांचा खेळ खेळून ऋताकडे जाणाऱ्या मार्गावरून वाटचाल करीत राहणें व तें जाणण्यासाठीं जरूर तें सामर्थ्य स्वतांठायीं निर्माण करणें हें सूज्ञपणाचें आहे व भागवत धर्माचा असाच दृष्टीकोन आहे. ऋत हें सर्वव्यापी असल्यामुळें समाज कल्याण व दीनोद्धार हा श्रेष्ठ धर्म भागवत धर्मानें मानला आहे. कारण ऋताची ती एक उत्कृष्ठ उपासना आहे.



## —● गुरुराया साईसदया ●—

गुरुरायाऽ साईसदयाऽ वंदन तव पाया ॥धृ०॥
तव सेवेसी आता सखया । अर्पिली ही काया ॥ १ ॥
तव नामाने पापी पामर । तरुन जाती हा भवसागर ॥ २ ॥
तूं योगेश्वर, तूं हृदयेश्वर । मूर्तिमंत तूं रे सर्वेश्वर ॥ ३ ॥
दुःख संकटे जाति विलया । असता तुझ्या कृपेची छाया ॥४॥
नमितो तुजला दुस्तर अवघी । मुक्ति झाली लीन तवपदी ॥ ५
पावन जगती तुझी समाधी । मोक्ष देई मज तव किमया ॥ ६ ॥

**कवि : बा. भा. मगदूम**

# नामदेवांची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु कविटकर**, एम्. ए.

## मुक्ति—सोपान

### राग सोरठ

रूड़ो ठाकुर रड़बो।
        रूपवन्त गुणवन्त सिआने।
राम भक्ति बिन मरबो।
        अंभ बिलोडै धिरत नहीं निकसे।
बालू तेल न कढ़बो।
        जो पुरुषा पर नारी संग राते
त्रिन बैसंतर सड़बो।
        नाम न जप्यो सोधित् नहीं पायो।
कहाँ बेद मुख पडबो।
        नामा कहै चित हरि स्यों राता
सहज की पौड़ा चढ़बो॥

**अर्थः**—सर्वश्रेष्ठ देवराथाची भक्ति करा. कोणी रूपवान असो, कोणी गुणवान असो, ईश्वरभक्ति नसेल तर तो मेल्यासारखा होय. पाणी घुसळल्यानें तूप निघत नाही किंवा वाळू रगडल्यानें तेल काढतां येत नाही. तद्वत् सौंदर्य, गुण आणि विद्या या बाह्य साधनांनीं परमात्म्यांची प्राप्ति होत नाहीं. जो पुरुष परनारीच्या सहवासांत रंगून जातो तो दुर्दशेप्रत जातो. जो नाम—जप करीत नाहीं त्याला मनःशांति प्राप्त होत नाहीं. मुखानें नुसते वेदपठन करून काय उपयोग? नामदेव म्हणतात, त्या ईश्वराच्या ठिकाणीं चित्त अनुरक्त होईल तर सहजावस्थेप्रत नेणारा मार्ग तुम्हीं चढून जाल.

(१) रुपवन्त गुणवन्त सिआने,
राम भक्ति बिन मरबो—

गुरु नानकांनी म्हटले आहे—

अति सुंदर कुलीन चतुमुखि ङि. आनी धनवंत।
मिरतक कही अहि नानका जिह प्रीति नहीं भगवंत॥

(श्री. गु. ग्र. सा., गउडी, बावन अक्खरी, महला ५ पृष्ठ २५३)

(चारहि वेद मुखोद्गत असलेला मौखिक ज्ञानी कितीहि सुंदर असेल, मोठ्या कुळांतील त्याच्या अंतःकरणांत परमात्म्याबद्दल प्रेमभावना नसेल तर तो मृतवत होय.)

---



# बालपणांतील कांहीं आठवणी

गांधी-जयंतीलाच लालबहादुरांचा जन्म झाला, २ ऑक्टोबर १९०४ रोजी. उत्तर प्रदेशांत मोंगलसराई हें त्यांचे जन्मगांव. काशीपासून केवळ सात मैल अंतरावरचे. लहानपणी लालबहादुरांना 'नन्हे' या नांवानें घरांत ओळखत. नन्हे म्हणजे चिमुकला. गंगेच्या तीरावर खेळण्यांत लालबहादुरांचे बालपण गेले.

लालबहादूर शास्त्री यांचे वडील श्री. शारदाप्रसाद श्रीवास्तव. ते एका प्राथमिक शाळेंत होते. नंतर त्यांनीं अलाहाबाद येथें स्थलांतर केले. आपला पेशाहि बदलला. कारकुनी नोकरी पत्करली.

लालबहादुरांना पित्याचे छत्र फार काळ लाभलें नाही. केवळ दीड वर्षांचे असतांनाच त्यांचे वडील वारले. आईला विसाव्या वर्षींच वैधव्य आले! लालबहादुरांची आई आपल्या वडिलांची सर्वांत थोरली मुलगी होती. घरीं अतिशय प्रेमळ वातावरणांत तिचे आयुष्य गेलेले. वडील तिचे खूप लाड करीत. वास्तविक रूढीप्रमाणें

तिने वैधव्यानंतरहि सासरींच रहायचें; पण लालबहादुरांच्या आजोबांनीं तिला माहेरी आणले. मुलीवर कोसळलेल्या आपत्तीबद्दल त्यांना अतिशय इळइळ वाटायची.

लालबहादूर अगदी लहान असतानाची एक गोष्ट. गंगेच्या तीरावर कसली तरी जत्रा भरली होती; आणि लालबहादुरांची आई रामदुलारी देवी गंगास्नानासाठी गेली होती. अफाट गर्दी जमली होती. धक्काबुकी, लोटालोटी होत होती. त्या गोंधळांत रामदुलारी देवीच्या हातातून लालबहादुरांचा हात निसटला आणि गर्दीत कुठे तरी ते दिसेनासे झाले! आईचा जीव कासावीस झाला. त्यांनी सर्वत्र शोध सुरू केला, पण मुलाचा पत्ता लागेना. अखेर पोलिसांत वर्दी देण्यांत आली.

त्या गर्दींत ते एका गवळयाच्या हाऱ्यात फेकले गेले. तो गवळीही आपल्या पदरी पडलेलें तें मूल गंगामाईचा प्रसाद आहे, असे मानून घेरी घेऊन गेला! कारण त्याला मूलबाळ नव्हते! गंगामाईने आपली प्रार्थना एकून हे मूल दिले, असे त्याला वाटलें. त्यांच्या घरी आनंदी आनंद झाला!

पण नंतर ह्याचा पत्ता लागला. गवळयाच्या घरचा आनंद मावळला. तो विनवणी करू लागला. "मूल नेऊ नका, गंगामाईचा प्रसाद!" म्हणून रडू लागला; पण त्याचा उपयोग झाला नाहीं. पोलिसांनीं रामदुलारींना त्याचे मूल मिळवून दिले. मायलेकरांची पुन्हां गांठभेट करून दिली.

लालबहादूर यांचे प्राथमिक शिक्षण आजोळीच झाले. आजोळच्या प्रेमळ वातावरणांत त्यांचा काळ खूप आनंदांत गेला. नंतर ते बनारसला पुढील शिक्षणासाठीं आपल्या मावशीकडे येऊन राहिले. तेथे हरिश्चंद्र हायस्कूलमध्यें त्यांचे नांव दाखल करण्यांत आले. मावसे रघुनाथप्रसाद त्यांची शिस्त आणि त्यांचे निर्मळ चारित्र्य यांचा लालबहादुरांच्या कोवळया मनावर खोल ठसा उमटला. त्यांना रघुनाथप्रसादाबद्दल अतिशय आदर वाटत असे. रघुनाथप्रसादांची घरची परिस्थिती ओढगस्तीची. तथापि त्यांनी मुलांच्या शिक्षणाची आबाळ होऊ दिली नाहीं. मुलांची सर्वतोपरी वाढ होईल, इकडे ह्यांचे लक्ष असे.

संध्याकाळी शाळेतून घरी आल्यावर लालबहादूर मित्रांबरोबर खेळावयास जात; पण इतर मुलांसारखे हॉकी-फुटबॉल यांना लागणारे साहित्य त्यांच्याकडे नसायचे. चिंध्याचांध्याचा चेंडू बनवायचा आणि खेळायचे. चेंडू लहान झाला तर हॉकीचा बॉल आणि मोठा झाला तर फुटबॉल! झाडांच्या लहान फांद्या तोडून हॉकीच्या काठ्या बनवून घेत असत.

गंगेच्या तीरावर हुंदडण्यात लालबहादुरांचे बालपण गेले. पोहण्याचा छंदहि त्यांना लहानपणापासूनचाच. ते उत्तम पोहत. गंगेचे पात्रहि ते सहज ओलांडीत. त्या काळी गंगेच्या तीरावर अनेक जत्रा भरत. एकदा पलीकडच्या तीरी जत्रेसाठी त्यांना जायचे होते. जत्रेत हिंडून रमतगमत त्यांनी दिवस घालवला. संध्याकाळी सर्वजण परतत होते. लालबहादुर शास्त्री मागेच रेंगाळले. बरोबरीचे नावेतून पलीकडे निघाले. अंधार दाटू लागला लालबहादुरांनी नदीत उडी घेतली. जवळपास अर्धा मैल नदीचे पात्र; पण लालबहादुर पोहत पैलतीरी पोचले. त्यांच्याजवळ परतीच्या भाड्याचे पैसे नव्हते. म्हणून हे साहस! मित्रांना ही गोष्ट कळू नये, अशी त्यांची इच्छा! लालबहादुरांना लहानपणी वाचनाचा विलक्षण छंद. हाती येईल ते पुस्तक ते वाचून काढीत. कळत नसले तरी वाचीत! हिंदीतील कांहीं कवींनी त्यांना वेड लावले होते. गुरु नानकाचे एक वचन त्यांना विलक्षण प्रिय होते. कितीदा तरी ते स्वतःशीच गुणगुणत. या दोह्याने आपल्या अंगी आत्मश्रद्धा आणि आत्मविश्वास यांची ओपासना झाली असे ते म्हणत. "महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती." अशा अर्थाचे ते वचन आहे. त्यांचा स्वभाव भावनावश. अवघे सहा वर्षांचे वय असतानाची ही गोष्ट. गांवातल्या सवंगड्याबरोबर हुंदडत सार्वजनिक बागेत दांडगाई करण्याची त्यांच्या मित्रांना इच्छा झाली. भर दुपारची वेळ. बाकीची मुले झाडावर चढून फळे तोडीत होती बिचारा नन्हे झाडाखाली उभा. एक फूल मात्र त्याने तोडले होते. इतक्यांत माळीबुवा आल्याची हूल उठली. बाकीची बिलंदर पोरे केव्हां सटकली! माळ्याच्या तावडीत बिचारा नन्हे गवसला आणि नन्हेला त्याने बरेच चोपले! नन्हे कळवळला. "अहो मला वडील नाहींत हो! गरीब आहे मी. का उगीच मला चोपता?" तो गयावया करूं लागला.

'मग तर तुझ्यावर चांगले वागण्याची अधिक जबाबदारी आहे.' माळीबुवांनी समजावले. तें वाक्य नन्हेच्या मनांत कायमचें कोरले गेलें. "मग तर तुझ्यावर चांगले वागण्याची अधिक जबाबदारी आहे" हे माळ्याचे वाक्य घोकतच नन्हे घरी आला. आपल्याला वडील नसल्याने भावी आयुष्य आपल्यालाच घडवावें लागणार आहे याची जाणीव त्या प्रसंगी त्याला झाली.



## साई तुजला स्मरूं

जिंकू अथवा मरूंऽ
साई तुजला स्मरूं ॥ ध्रु ॥
हानी होवो किती भयंकर ।
युगे युगे हें चालो संगर ।
अंति विजयीं ठरूं ॥ १ ॥
जो भक्त साईचा झाला——
रणचंडी नमिते त्याला ।
शिर तळहातीं धरूं ॥ २ ॥
श्रद्धेची करि तलवार ।
मी साईचा सरदार ।
अभिमान हाच नित धरूं ॥ ३ ॥
देहाची करुनि धुनी ।
मृत्यूस टाकू जाळूनि ।
मरूं पुन्हां अवतरूं ॥ ४ ॥

★

## साई उरला विश्व व्यापुनी

ऊठ मुकुंदा समाधीतुनी ।
खड्ग घे करी खलनिर्दालनी ॥ १ ॥
पापानी ही भरली अवनी ।
पार्थसख्या तूं येई धाऊनीं ॥ २ ॥
तुझ्या दर्शने दैन्य जळावें ।
युगायुगाचे बंध तुटावे ॥ ३ ॥
तव तेजानें लाभो जगता ।
धर्माची सांगता ॥ ४ ॥
नाम असावें तुझेंच वदनी ।
मूर्त ठसावी ध्यानी स्वप्नी ॥ ५ ॥
पूजा घे ही हृदय-फुलानी ।
साई उरला विश्व व्यापुनी ॥ ६ ॥

—कवि : बा. भा. मगदूम

# परमार्थ मार्गावरील पायऱ्या

गुरुदेव डॉ. रानडे

इंद्रियजन्य सुखांचा त्याग करून ईश्वर व त्याचे भक्त यावर विश्वास ठेवणें ही परमार्थ–मार्गांवरील प्रगतीची पहिली पायरी होय. ' परमार्थाविषयीं खरी जिज्ञासा व आवड माझ्या मनांत उत्पन्न झाल्या नव्हत्या तोंपर्यंत मला संतांबद्दल प्रेम वाटत नव्हतें व त्यांच्या वचनामृतांची आवड वाटत नव्हती ' असे उद्गार दहाव्या अध्यायात अर्जुनानें काढल्याचें श्री ज्ञानेश्वरांनी सांगितलें आहे. " मागें अनेकदां याप्रमाणें ऋषीश्वरांनीं तुझ्याविषयीं सांगितलें होतें, परंतु देवा ! आतां तुझी कृपा मजवर झाली म्हणूनच त्यांच्या सांगण्याचा खरेपणा माझ्या अंत:करणास पटतो. श्री नारद मुनि माझ्याजवळ येऊन अखंडपणें याच शब्दांनीं तुझी कीर्ति गात असत; परंतु, त्याचा अर्थ न समजतां मी केवळ गीतसुखच उपभोगीत होतो ! आंधळ्याच्या गावांत सूर्य आपण होऊनच उगवला तरी त्या आंधळ्यांना कोवळ्या उन्हाचा अनुभव काय मिळणार ! त्यांना प्रकाश पाहतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें देवर्षि आत्म्याच्या स्वरूपाविषयीं गात तेव्हा केवळ बाह्य रागदारी ऐकावयास मी जात होतों. त्यांतील खोल आध्यात्मिक विचार मी कधींच समजून घेतले नाहींत. असित व देवल ऋषीहि याप्रमाणेंच तुझे गुण वर्णन करीत. परंतु त्या वेळीं माझी बुद्धि विषय–विषानें व्यापलेली होती. या विषयाचें सामर्थ्य काहीं विलक्षण आहे ! त्यांच्यामुळें जीवांस गोड परमार्थ कडू लागतो व कडू विषय गोड लागतात ! इतरांचे तर राहोच, परंतु प्रत्यक्ष व्यास मुनि आपण स्वत: देवळांत येऊन तुझ्या रूपाविषयीं सदासर्वदा सांगत ! तरीहि अंधारांत चिंतामणी पाहुन तो न ओळखतां आल्यामुळें टाकावा व दिवस उगवताच ओळख पटून स्वीकारावा, तसें माझें झालें ! कृष्णा, तूं सूर्य मजजवळ नव्हतास म्हणून व्यासादिकांचे बोलणीं जरी चिंद्रत्नाच्या खाणीप्रमाणें अमूल्य होतीं, तरी माझ्याकडून तीं उपेक्षिलीं गेलीं ! आता तुझे शब्द-किरण फांकतांच पूर्वी सर्व ऋषींनीं जे मार्ग सांगितले होते ते सर्व मला स्पष्टपणें दिसूं लागले व त्या सर्वांची नीट ओळख पटली. त्यांचे शब्द म्हणजे खरोखरच ज्ञानाचें बीं होय व तें माझ्या हृदयभूमींत खोल पडलें होतें, परंतु तुझ्या *कृपावृष्टीचा ओलावा त्यास मिळाला म्हणूनच त्यास फळें आलीं ! मी या तुझ्या संवाद-सुखाचा जणुं महासागर बनलों आहे व नारदादि संतांच्या शब्दांचे प्रवाह त्यास मिळाले आहेत. माझ्या वाडवडिलांच्या तोंडून मीं तुझा महिमा ऐकलाच होता, तरीहि माझ्यावर तुझी कृपा झाली नव्हती, म्हणून आजपर्यंत मी तुला जाणूं

शकलों नाहीं. भाग्य अनुकूल होतें तेव्हाच मनुष्याच्या प्रयत्नांस यश मिळतें. माळी झाडास व वेलीस वाटेल तितकें पाणी घालतो. परंतु वसंत येतो तेव्हाच त्याना फळें लागतात, त्याप्रमाणें सर्व शास्त्रें पालथी घातली किंवा सर्व योगांचा अभ्यास केला. तरी गुरु सानुकूल होऊन कृपा करतील तेव्हाच यश मिळतें." ( ज्ञा. १०, १४४–१७२ )

### सद्गुरु-कृपा.

श्रीसद्गुरूंची कृपा शिष्यांवर कशी होईल ? यास एकच उपाय आहे. असें श्रीज्ञानेश्वर सांगतात, संतांची सर्वस्वानें सेवा करावी. " संत म्हणजे ज्ञानाचे मंदिर होय. त्यांची सेवा म्हणजे त्या मंदिराचा उंबरठा. त्यांचा आश्रय घेऊन मंदिरांत प्रवेश मिळवावा. कायेनें, वाचेने मनानें त्यांच्या चरणीं लागावें अहंकार टाकून त्यांचें सर्व प्रकारें दास्य करावें. म्हणजे आमच्या मनात काय इच्छा आहे हे तें सांगतील. त्यांनीं बोध केला म्हणजे आमच्या मनांतील सर्व संकल्प नाहीसे होतील. त्यांच्या शब्दांच्या प्रकाशानें आमचे चित्त बलवान होईल. आमचे संशय नाहीसे होतील, तेव्हां सर्व प्राणिमात्र आपल्यासह परमेश्वरांत एकरूप होऊन राहिलेले आम्हांस दिसून येतील; मोहांधकार नाहीसा होईल, ज्ञानप्रकाश उजाडेल व श्रीगुरु कृपा करतील. " ( ज्ञा. ४, (१५५–७१. )

### योग्य वेळीं श्रीसद्गुरुंचें दर्शन

श्रीसद्गुरु योग्य वेळ आली कीं भेटतात असें श्री ज्ञानेश्वरानीं एके ठिकाणीं सांगितलें आहे. आम्हीं आपली तयारी करावी, कीं सद्गुरु आम्हांस हुडकत येतील. " पुत्र, वित्त व बायको म्हणजे एक विषाचें भांडे आहे असें मानावें. इंद्रिय-विषयानें मन संतप्त झालें म्हणजे ते अंतर्मुख होतें व अंतःकरणांतील खोल जागीं जाऊन बसतें. अशा वेळीं मनुष्य आपल्या मनास प्रत्यक्ष आत्म्याचें ध्यान करावयास लावतो. बाकी राहिलेलीं कामें संपली व नवीन आरंभ केलेल्या कर्मास फळ येणें बंद झालें, अशा कर्मदशेच्या साम्यावस्थेंत श्रीगुरु आपोआप भेटतात. रात्रीचे चार प्रहर संपले कीं प्रत्यक्ष सूर्य आपल्या नजरेस पडतो. प्रकाशानें अंधार नाहीसा होतो. त्याप्रमाणें गुरुकृपेनें अज्ञान तिमिर नाहीसें होतें. ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता ही त्रिपुटी ज्ञानात नाहीशी होतें. तोंडासमोरील आरसा काढला म्हणजे पाहणारा जसा न पाहतां राहतो, त्याप्रमाणें नैष्कर्म्य प्राप्त होतें. ही परमसिद्धि होय. श्रीगुरु कृपा करतील तेव्हांच ही मिळते. गुरुकृपेचे शब्द कानीं पडतांच ज्याची सर्व माया नाहीशी झाली असा मनुष्य विरळा ! त्याच्या शब्दानें आत्मसिद्धि प्राप्त होतें." ( ज्ञा., १८, ९५८–९९१. )

**नाममहिमा**

ईश्वराशीं ऐक्य प्राप्त करून ध्यावयाचें झाल्यास त्याचें नाम व कीर्तन हें एकच साधन भक्तिसंप्रदायाच्या सर्व प्रवर्तकांनी सांगितलें आहे: "या कीर्तनाच्या उत्कर्षांच्या योगानें त्यांनी जगात प्रायश्चित्ताची जरुरीच नाहीं असें केलें, पापास जगाबाहेर घालविलें, यम व दम याना अवकळा आणली, तीर्थ–क्षेत्रें निरुपयोगी केलीं व यमलोकची रहदारी एकदम थांबविली. यमानें आता कोणाला ताब्यात ठेवावें ? संयमानें कोणाचा संयम करावा ? 'दोष औषधासहि राहिला नाही, तेव्हा आम्हीं दोष काय नाहीसे करावे ?' असे तीर्थें म्हणूं लागलीं ! याप्रमाणें त्यांनीं माझ्या नामघोषानें विश्वातलीं सर्व दुःखें नाहीशीं केलीं; सर्व जगच परमानंदानें दुमदुमून भरून टाकलें. ते पहाटेवीण पाहावयास लावतात; अमृताशिवाय नवजीवन निर्माण करतात; योगाभ्यासाच्या दगदगीशिवायच ईश्वराचें दर्शन घडवितात; राजाना व रंकांना, तसेंच लहानांना व मोठ्यांना समान लेखतात व सर्व जग आनंदानें भरून टाकतात । हजारों मनुष्यांपैकीं एकादाच मरणानंतर वैकुंठास जात असेल; पण त्यांनीं तर तिन्ही लोकच वैकुंठ केलें ! माझ्या नामघोषानें त्यानी हें सर्व जग स्वच्छ व पापरहित केलें. तेजानें ते सूर्यापेक्षां जास्त तेजस्वी आहेत, कारण सूर्य मावळतो; पण त्याचें तेज कधींच कमी होत नाहीं. चंद्र एखादे वेळींच पूर्ण असतो, तर हे सदा पूर्ण असतात. मेघ उदार असतो; पण तो सरतो, म्हणून तो उपमेस उणा पडतो. ते सिंहाप्रमाणें निःशंक व कृपाळू असतात. त्यांच्या जिव्हेवर माझें नाव मोठ्या आवडीनें अखंड नाचत असतें. हजारो जन्म वायां घालवावे तेव्हां कोठें सुदैवानें एक वेळ नामाचा उच्चार घडतो. मी वैकुंठी नसतों; एखादे वेळीं मी सूर्य–बिंबावरहि दिसणार नाहीं; योग्यांचीं मनें देखील मी ओलांडून जातों. मी कोठें हरवलोंच, तर जे माझा नामघोष करतात त्यांच्यापुढें मी नेहमीं असतों व म्हणून तेथें मी हटकून सांपडतों. त माझ्या गुणामध्यें इतके तल्लीन होतात कीं, त्याना देश–काळांचा विसर पडतो व ते आपल्या कीर्तन–सुखातच रमून जातात." (ज्ञा. ९, १९७-२०९.)

**परमार्थांत अभ्यासाचें महत्त्व·**

ईश्वराच्या नामस्मरणाच्या भरीला योगांतील कांहीं साधनें घालावयाचीं असा एक ईश्वरप्राप्तीचा किंचित् मिश्र व निराळा मार्ग परमार्थांत आहे. राजयोग योग्य रीतीनें आचरला तर तो भक्ति-मार्गाशीं मुळींच विरोधक होत नाहीं. परंतु, हठयोग मात्र या दोहोंहून भिन्न आहे. "या योगाच्या अभ्यासानें तूं आपलें मन बळकट कर. योग्य साधनांचा अवलंब केल्यास पांगळ्यास देखील पर्वत ओलांडून जाता येईल, शरीर राहो अथवा जावो, चांगल्या अभ्यासानें तुझें मन तूं निरंतर परमात्म-प्राप्तीच्या मार्गास लाव, म्हणजे नाना प्रकारची गति देणारें तुझें मन आत्मरायास वरील

व देह गेला किंवा राहिला याची आठवण देखील तुला राहणार नाहीं. ( ज्ञा. ८, ८१-८३. ) अशा प्रकारच्या योगाभ्यासानें आपले मन हळूहळू ईश्वराकडे लागतें हा योगांतील महत्त्वाचा भाग होय. " मन-बुद्धीसहित तुझें चित्त तुला माझ्याकडे एकदम सर्वस्वीं लावतां येत नसेल, तर आठ प्रहरांपैकीं कांहीं क्षण तरी माझें ध्यान कर. माझ्या ध्यानात घालविलेला प्रत्येक क्षण तुझ्या मनास विषयसुखापासून दूर नेईल व मग शरत्काळांत नदीचा प्रवाह क्षीण होऊं लागतो, त्याप्रमाणें तुझें चित्त संसार-बंधनांतून मुक्त होईल. आणि पौर्णिमेनंतर चंद्रबिंब ज्याप्रमाणे रोज कमी कमी होत जाऊन अमावास्येच्या दिवशीं पूर्ण नाहींसें होतें, त्याप्रमाणें तुझें चित्त विषयभोगातून हळूहळू निघून माझ्यांत शिरूं लागून शेवटीं सर्वस्वीं मद्रूप होईल. अभ्यास-योग म्हणतात तो हाच. यास अशक्य असें कांहींच नाहीं. याच्या बळानें कांहीं लोक आकाशात हिंडूं लागले, तर कांहींनीं सिंह व साप अशा हिंस्र व विषारी प्राण्यास निरुपद्रवी केलें. कांहींनीं विषहि पचविलें कांहीं समुद्रातून पायीं चालत गेले व कांहींनीं वेद मुखोद्गत केले. या अभ्यासयोगास दुष्कर असे कांहींच नाहीं. म्हणून अर्जुना, या अभ्यासानें तूं माझ्यात मिसळून एकरूप होऊन जा. " ( ज्ञा. १२, १०४-११ )

## अभ्यासास योग्य स्थान

यानंतर ध्यानास योग्य स्थान कसें असावें याचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं दिलें आहे : " त्या ठिकाणी बसल्याबरोबर समाधानाची आवड वाढते व तेथून उठूंच नये असे वाटतें. तें ठिकाण पाहिल्यानें वैराग्य दुणावत. त्या ठिकाणीं संतांनीं ईश्वर-प्राप्ती-साठीं ध्यान केलेलें असावें. तेथें संतोष वाढावा व धैर्यास आणि उत्साहास मदत व्हावी. त्या जागेवरून सहज गेलें असता अज्ञेयवादी व नास्तिक यानाहि तेथें साधनास बसण्याची इच्छा व्हावी. जें मन सदैव भ्रमतें तेंहि तेथें स्थिर व्हावें व विरक्ति झोपी गेली असली, तर तें स्थान नुसतें पाहिल्यानें ती खडबडून जागी व्हावी ! राजे लोकां नाहि आपलें राज्य सोडून येथें शांतपणें तपश्चर्या करावी असा मोह उत्पन्न व्हावा. हें स्थान पाहतांच विषयी लोकांनीं आपली विषयावरील आसक्ति टाकून द्यावी. तेथें अनेक योगी योगाभ्यासाकरिता एकत्र आलेले असावे. तेथें लोकांची वर्दळ नसावी. तेथें झाडाची गर्दी असावी व फळझाडाना बाराहि महिने मुळापर्यंत अमृताप्रमाणें गोड फळें लागत असावीं. पावसाळा नसला तरी तेथें पावलोपावलीं स्वच्छ पाणी उपलब्ध असावें व विशेषतः पाण्याचे झरे सुलभ असावे. वारा निश्चळ असावा किंवा फार तर मंद वाहत असावा. सूर्याचा प्रकाश थंड वाटावा. तें स्थान अत्यंत शांत निःशब्द असावें. तेथें उग्र पशूंची वस्ती नसावी. तेथें पोपट नसावे; मधमाश्या नसाव्या. पाण्याच्या आश्रयानें असलेले दोन-चार हंस वा चक्रवाक पक्षी असले वा

एखादे वेळीं एखादी कोकिळा येऊन बसली तर चालेल. निरंतर वास न करतां मधूनच कांहीं मोर आले व गेले, तर त्यांना आमचा मज्जाव नाहीं. तेथें एखादा मठ किंवा एखादें शिवमंदिर पाहून त्यांत ध्यानास बसावें." (ज्ञा. ६, १६३-१७९).

## कुंडलिनीचें उत्थान व अनाहत नाद

अशा जागीं ध्यानास बसल्यावर कुंडलिनीचें उत्थान होणें हें योगाभ्यास यशस्वी झाल्याचें प्रथम चिन्ह होय. कुंडलिनी जागृत होऊन अंतःकरण मारून टाकते, तेव्हा अनाहत नाद ऐकूं येऊं लागतो. कुंडलिनी हा नाद किंचित् ऐकूं लागते. नादाची गर्जना होऊं लागली कीं प्रणवाचीं व नादचित्राचीं सुंदर रूपडीं दिसूं लागतात. या ज्ञानास ज्ञाता व ज्ञेय यांची अपेक्षा नसते. या ध्यान–स्थितींत ज्ञाता ज्ञेयाहून भिन्न कसा राहील ? मग हें गर्जतें तें काय ? अर्जुना, मी तुला सांगावयास विसरलों कीं, ज्याअर्थी वाग्घोष नाश नाहीं, त्याअर्थी सर्व गगनासच जणूं वाचा फुटून तें घुमूं लागतें ! त्या अनाहत नादानें दिशा भरून जातात व ब्रह्मरंध्राचें कपाट आपोआप उघडतें ! ( ज्ञा., ६, २७४–७९. )

## योगमार्गावरील अडचणी

भक्तीचा लवलेश अंगीं नसतां हटयोगानें जो ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न करतो, त्याचा मार्ग किती कठीण आहे याची श्रीज्ञानेश्वरांना पूर्ण कल्पना आहे. अशा माणसाची स्थिति भक्ति–मार्ग चोखळणाऱ्या माणसापेक्षा किती भिन्न आहे याचें वर्णन श्री ज्ञानेश्वरांनीं बाराव्या अध्यायात दिलें आहे : " सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाकरितां जे अव्यक्त व शुद्ध ब्रह्माची प्राप्ति व्हावी म्हणून प्रयत्न करतात त्यांच्या अंतःकरणांत भक्तीचा लवलेशहि नसतो, त्यांच्या मार्गांत ऋद्धिसिद्धींचे अडथळे येतात; इंद्रप्राप्तीरूपी वाटमाऱ्ये त्यांना लुबाडतात. तहानेनें तहानच प्यावी, भुकेनें भूकच खावी, अहोरात्र हाताच्या सहाय्यानें वारा मापवा, शीत वेढावें, उष्ण पांघरावें किंवा प्रत्यक्ष पावसाच्या घरांत जाऊन राहावें, त्याप्रमाणें हा योगाभ्यास म्हणजे भ्रताराविण रोज नवा अग्निप्रवेश होय ! म्हणून हा मार्ग आक्रमणाऱ्यांना दुःखाशिवाय कांहींच लाभत नाहीं. दात पडलेल्यानें लोखंडाचे चणे खाल्ले तर तो जगेल का मरेल, सांग पाहूं ! पांगळ्यानें वेगाच्या बाबतींत वाऱ्याशीं स्पर्धा करूं नये, त्याप्रमाणें देह धारण केलेल्यांनीं अव्यक्त मिळविण्याची आशा धरूं नये. तरी देखील ते आकाशाशीं मोठ्या धाडसानें कुस्ती खेळूं लागले, तर त्या लोकांस अनंत क्लेश मात्र होतील. परंतु, जे भक्तिमार्गानें जातात त्यांना या प्रकारची व्यथा भोगावी लागत नाहीं." ( ज्ञा, १२, ६०–७५. )

## ईश्वराचें सर्वगत ध्यान

भक्तानें आपल्या आंत बाहेर सर्वत्र परमेश्वरासच पाहावें : म्हणून तूं सदा माझें स्मरण करावें, जें डोळ्यानीं पाहतोस, कानानें ऐकतोस, मनानें चिंतितोस,

वाचेनें बोलतोस, ते अंतर्बाह्य सर्व तू मद्रूप करून टाकावें म्हणजे सर्व काळीं व सर्वत्र मी एकटाच आहे हें तुझ्या अनुभवास येईल. ही स्थिति प्राप्त झाल्यावर, देह पडला तरी मनुष्य मरत नाहीं. मग तुला लढाई करण्यास भीति का वाटावी ? मन व बुद्धि तूं मला खरोखर अर्पण करशील, तर तू मलाच येऊन मिळशील हें मी शपथेवर सांगतों. असें होईल किंवा नाहीं याबद्दल तुला संशय वाटत असेल, तर त्याचा अभ्यास करून पाहा व तुला यश आलें नाहीं, खुशाल माझें सांगणें खोटें आहे असें म्हण." ( ज्ञा., ८, ७५-८०. ) देव सर्व मानसिक अवस्थांशीं एकरूप आहे, त्याचप्रमाणें तो सर्व बाह्य वस्तूंशीं देखील एकरूप आहे; अर्जुनानें विश्वरूप पाहिलें तेव्हां त्यास बाहेर सर्वत्र देव दिसला नाही काय ? 'तूं नाहीस असें स्थान कोठें आहे तें सांग !' असें अर्जुनानें देवास विचारलें. 'तू जसा आहेस तसा तुला माझा नमस्कार असो !' अशा प्रकारें देवाची पुनः पुनः स्तुति करून त्यास अर्जुनानें प्रणाम केले व तो म्हणाला, "प्रभो, तुला नमस्कार असोत, नमस्कार असोत !" पुनः देवाच्या रूपाकडे त्यानें न्याहाळून पाहिलें व तो "नमस्ते, नमस्ते" म्हणाला. परमात्म्याच्या रूपाकडे शेवटपर्यंत पाहून त्याचें अंतःकरण आनंदानें भरून आलें व तो पुनः म्हणाला, "प्रभो, नमस्ते, नमस्ते !" या सर्व चराचर विश्वामध्यें त्यानें परमात्म्यास पाहिलें व तो म्हणाला, "प्रभो, नमस्ते, नमस्ते !" त्यास स्तुति करण्यास कांहींच शब्द आठवेनात व स्तब्धहि राहवेना. तो प्रेमानें भरून गेला व आनंदाच्या भरांत "सन्मुखा, तुला सहस्र नमस्कार असोत !' असे उद्‌गार त्याच्या तोंडून सहज निघाले. "देवास पाठ व पोट आहेत किंवा नाही, आगा-पिछा आहे किंवा नाहीं, याचा विचार करून आम्हांस काय उपयोग ? स्वामी, तुला पाठमोराहि माझा नमस्कार असो ! तूं माझ्या पाठीमागेंहि माझें रक्षण करण्यास उभा आहेस, म्हणूनच तुला पाठमोरा म्हणावयाचें ! नाहीं तर मागें व पुढें हा भेदच तुझ्यांत संभवत नाहीं. तुझ्या सर्व अवयवांचें वर्णन करण्यास मी पूर्ण असमर्थ आहे. म्हणून 'तूं सर्वात्मक आहेस' असें म्हणून , हे प्रभो, तुला मी सद्भावें नमस्कार करतों !" ( ज्ञ., ११
५१९-२२. )

### तेजरूप आत्मा.

परमात्मा ज्या अनेक रूपांनीं प्रकट होतो त्यांत तेज हें एक प्रमुख रूप आहे असें दिसतें. "तें आत्मतेज गगनाहून जुनें आणि परमाणुहून लहान व सूक्ष्म आहे; त्याच्या सान्निध्यानें हें विश्व चळतें, त्यापासून या सर्व विश्वाची उत्पत्ति होते व त्यामुळें हें सर्व विश्व जिवंत रहातें. तें तर्कांच्या व ध्यानाच्या पलीकडे आहे. चर्मचक्षूंस तें भर दिवसांसुद्धां अंधेरीप्रमाणें आहे. कारण,

विस्तवाला वाळवी लागत नाहीं. व प्रकाशांत अंधार शिरूं शकत नाही. परंतु ज्ञान्यांस तें अत्यंत तेजस्वी सूर्य किरणांची जणुं राशीच असून तेथें अस्तमानाचें नावहि नाहीं. असा नित्य उदय आहे." असें या आत्मतेजाचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनीं दिले आहे. ( ज्ञ., ८, ८०–९०. ) देव कापुराची दिव्य दिवटी हातांत घेऊन तत्त्वज्ञानानें शुद्ध झालेल्या ज्ञान्यांस परमार्थ–मार्ग दाखविणारा दिवट्या बनतो. असें श्री. ज्ञानेश्वर म्हणतात. " त्यांच्या डोळ्यांपुढील अज्ञान—अंधार नाहींसा करून परमात्मा त्याच्यापुढें शाश्वत प्रकाशाच्या रूपानें तळपतो !" ( ज्ञ., १०, १४१–४३. ) आत्म्याच्या या अनंत तेजाचें वर्णन याप्रमाणेंच अकराव्या अध्यायांतहि दिलें आहे. ' परमात्म्याच्या अंगांचें तेज इतकें आश्चर्यकारक आहे की त्याचें वर्णन करणेंच अशक्य आहे. प्रलयकालीं बाराहि प्रचंड सूर्यांचा मेळावा एकत्र झाला असतां त्यांचे तेज व्हावें तसें तें असतें. हजारों सूर्य एकदम आकाशांत उगवले असते तरी या आत्म्याच्या अनत तेजाची सर त्याना मुळींच आली नसती. सर्व विजा एकत्र जमविल्या, प्रलयाग्नीची सर्व सामग्री एकत्र आणली किंवा दहाहि महातेजें एकत्र मिळविलीं तरीहि सर्व मिळून देखील त्या परमात्म्याच्या तेजाच्या बरोबरीस मुळींच येणार नाहींत ! असें तें श्रीहरीचें सहज व महत् तेज चोहोंकडे तळपत होतें व तें मला मुनिश्रेष्ठाच्या कृपेनें पाहावयास मिळालें." ( ज्ञा. ११, २३७–४१. ) हें शेवटचें विधान संजयाच्या मुखीं घातलेलें असलें तरी तो प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरांचाच आत्मानुभव असेल काय ?

अर्जुनानें विश्वरूप पाहिलें तेव्हां परमात्मा आत्मज्ञापुढें कोणत्या रूपानें प्रगट होतो याचें वर्णन श्रीज्ञानेश्वरांनी केलें आहे : " ईश्वराचें प्रत्येक गंभीर व सुंदर स्वरूप पाहून अर्जुनाचें मन भांबावून गेलें व ईश्वर उभा आहे की बसलेला आहे कीं निजलेला आहे हें त्यास समजेना. त्यानें डोळे उघडून पाहिलें तेव्हां त्याला सर्व बाह्य विश्व ईश्वरी रूपानें भरलेलें दिसलें. त्यानें डोळे मिटले तेव्हां आंतहि त्यांस तेंच दृश्य दिसलें ! समोर अनंत मुखें दिसूं लागलीं म्हणून त्यानें मागें वळून पाहिलें तरी चोहोंकडे तींच मुखें व तेच करचरण त्याला दिसूं लागलीं ! ईश्वराकडे पाहिले असतां त्याचें रूप दृष्टीस पडावें यांत आश्चर्य काहींच नाहीं. त्याच्याकडे न पाहतांहि त्याचें रूप दिसलें हें मात्र महदाश्चर्य होय ! वस्तुतः अर्जुनावर कृपा करून नारायणच त्याचें पाहणें व न पाहणें व्यापून आपणच सर्व झाला ! म्हणून आश्चर्याच्या एका पुरातून तीरांवर येतांच अर्जुन पुनः आश्चर्याच्या दुसऱ्या महासागरांत पडला ! कारण, श्रीकृष्णानें अर्जुनास जी दिव्य दृष्टि दिली होती, तिला सूर्याच्या किंवा दिव्याच्या प्रकाशांत वस्तु दिसाव्या व डोळे मिटल्यानें त्या दिसेनाशा व्हाव्या अशी मर्यादा नव्हती. " ( ज्ञा. ११,२२६–३४ )

अर्जुनाच्या दृष्टिस स्वर्ग—पाताळ किंवा भूमि—अंतराळ हा भेद राहिला नाही. सर्व विश्वच ईश्वरमय झालें ! व पुढील उद्‌गार त्याच्या तोंडांतून सहज बाहेर पडले, ' देवा, तूं कोठून आलास ? तू बसला आहेस, का उभा आहेस ! कोणत्या मायेच्या पोटीं तूं होतास ? तुझी आकृति केवढी ! तुझें रूप कसें व वय किती आहे ? तुझ्या पलीकडे काय आहे ? तूं कशावर उभा आहेस ? याचा विचार केला तेव्हां तूंच सर्व आहेस, तूंच ह्या आधार आहेस व तूं कोणाचाहि नसून अनादि व अनंत आहेस, तू उंच किंवा नीचहि नाहींस, उभा किंवा बसलेलाहि नाहींस, तुझ्या खालीं व वर तूंच आहेस व हें अवघें तूंच आहेस, असा अनुभव उत्तरोत्तर वाढल्या प्रमाणांत मला आला. ' ( ज्ञा. ११,२७१—७९ )

## साक्षात्कार

साधकास आत्मसाक्षात्कार कसा घडतो याचें श्रीज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं सुंदर वर्णन केलें आहे. हें वर्णन अकराव्या अध्यायांत दिलेल्या विश्वरूपाच्या वर्णनापेक्षां जरा निराळें असणें स्वाभाविक आहे. कारण, अकराव्या अध्यायाचा विषयच विश्व-रूप—दर्शन असून, आतां आम्हीं देणार आहों तो पंधराव्या अध्यायाचा विषय आत्मदर्शन हा आहे. " आत्मज्ञानाच्या खड्गानें भवाश्वत्थांचें वर वाढणारें मूळ छेदून टाकल्यावर आपलें रूप आपणांस पाहावयास मिळतें, परंतु हें आरशांत आपलें प्रतिबिंब पाहण्याप्रमाणें मात्र नसतें. कारण, आरशांतील प्रतिबिंब पाहण्याप्रमाणें मात्र नसतें. कारण, आरशांतील प्रतिबिंब म्हणजे पाहणाऱ्या मनुष्याचेंच दुसरें रूप होय. आत्मदर्शन जिवंत झऱ्यासारखें आहे. तो झरा विहिरींत लागला नाहीं तरी आपल्यां-तच परिपूर्ण असतो. पाणी आटल्यावर प्रतिबिंब मूळ बिंबांत मिळतें, घट फुटला कीं घटाकाश महदाकाशांत मिळतें, लांकूड जळल्यावर अग्नि मूळ रूपास परत येतो, त्याप्रमाणें आपण आपलें रूप पाहावयाचें असतें. तें न पाहतां पाहावें व न जाणतां जाणावें. ज्यापासून हे सर्व विश्व निर्माण झालें, त्यासच आदिपुरुष म्हणावें. या मूळ पुरुषास पाहावें या उद्देशानें, आयुष्याचा तिटकारा येऊन व ध्येय गांठल्याशिवाय पुनः परत यावयाचें नाहीं या दृढ निश्चयानें खरें मुमुक्षु योगामार्गानें गेले, त्यांनीं आपला अहंभाव टाकून दिला आणि ते मूळ घरास आले. जसें थंडीनेंच कुडकुडावें किंवा बर्फानेंच बर्फ बनावें, त्याप्रमाणें ही आत्मवस्तु आपणच आपल्यासाठीं व आपल्यातच रहाते. येथें एकदां आल्यावर पुनः परतणें नाहीं. ' ( ज्ञा., १५, २६६—८३. )

## सुखाचें शिखर

ज्यानें आत्मानंद उपभोगिला त्याची विषयसुखाची इच्छा आपोआप नाहींशी होते, असें श्रीज्ञानेश्वर वारंवार सांगतात. ' आत्मरत ज्ञानी पुरुषाच्या सर्व

विषयवासना नष्ट होतात व तो फिरून विषयसुखांकडे ढुंकूनसुद्धां पाहत नाहीं. यात कांहींच आश्चर्य नाहीं. त्याचें अंतःकरण आत्मसुखानें भरून गेलेलें असतें. म्हणून तो बाहेर विषयसुखाकडे पाऊलहि टाकत नाहींत. अर्जुना कमळाची कोवळीं पानें खाणारा व चंद्राचीं शुभ्र व थंड किरणें पिणारा चकोर पक्षी वाळवंटातील वाळू कधीं चुंबील का, सांग पाहू ? त्याप्रमाणें ज्याला उत्कृष्ट आत्मसुख सहज प्राप्त झालें, त्यानें सर्व विषय सहज सांडावें यात काय नवल आहे !' (ज्ञा. ५, १०५-१०८) हीच कल्पना पुनः बाराव्या अध्यायांत श्रीज्ञानेश्वरांनीं मांडली आहे. आत्मसुखास जगांत दुसरी तोड नाहीं. म्हणून आत्मज्ञास विषयसुखांची लालसा राहात नाहीं असें म्हटलें आहे. ' तो आपणच विश्वरूप झाल्यामुळें त्याचा सर्व भेदभाव नाहींसा होतो. त्याचप्रमाणें त्याचे सर्व द्वेषभावहि नाहींसे होतात. जें वस्तुतः आपलें आहे तें म्हणजे आत्मज्ञान होय. तें कल्पांतींहि नाहींसें होत नाहीं याची त्यास पूर्ण जाणीव असल्यामुळें व आपल्याबाहेर कांहींच नाहीं व आपल्यांतच सर्व सांठवलेलें आहे या ज्ञानामुळें, तो गेल्याचा शोक करीत नाहीं. व कशाचीहि आकांक्षा बाळगीत नाहीं. तो मूर्तिमंत आत्मज्ञानच होऊन राहतो. त्यांत त्यानें जर माझी भक्ति केली तर त्याच्यासारखा प्रिय मला या जगांत कोणीहि नाहीं हें अर्जुना तुला मी शपथेवर सांगतो. (ज्ञा. १२, १९०—९६.) तो अंतरीच्या महासुखांत इतका तल्लीन झालेला असतो कीं, ऋद्धी व सिद्धी आल्या वा गेल्या तरी त्याची त्यास फिकीर नसतें. तो आपल्या आत्म्याच्या सुंदर राजमंदिरांत राहात असल्यामुळें इंद्रभुवनहि तुच्छ मानतो. मग तो भिल्लाच्या मोडक्या झोपडीनें कसा संतुष्ट होईल ? जो अमृताला नांवें ठेवतो तो कांजी सेवील काय ? अर्जुना, याचप्रमाणें जो आत्मसुखाचा आनंद उपभोगतो तो ऋद्धीचा भोग घेणार नाहीं. याप्रमाणें आत्मानंदाने जो संतुष्ट होतो, परमानंदानें पुष्ट होतो व जो सर्व अहंकार टाकून व सर्व कामवासना सोडून स्वतःच सर्व विश्व होऊन विश्रांत राहतो, तोच खरोखर श्रेष्ठ स्थितप्रज्ञ होय असें तूं जाण." (ज्ञा., २, ३६२–६७.) शेवटीं, अर्जुनाच्या मुखानें श्रीज्ञानेश्वरांनी आत्मप्राप्तीच्या परमानंदाचें वर्णन केलें आहे : "या परमानंदाशी तुलना केली असतां देवांनी समुद्र-मंथन करून जें अमृत काढलें त्यास अमृत हें खोटें नावे पडलें असें वाटतें. परंतु, तें अल्प व नाशवंत अमृतहि जर इतकें गोड असतें, तर आत्मानंदरूपी परमामृत किती गोड असेल बरें ! तें परमामृत मिळविण्यासाठीं मंदार पर्वताची रवी घेऊन समुद्राचें मंथन करण्याची जरूरी नाहीं. तें अनादि व स्वयंसिद्ध असल्यामुळें साधकास योग्य वेळीं सहज प्राप्त होतें. तें परिणामीं इतकें जबरदस्त, उपकारक व समर्थ असतें कीं, त्याविषयीं नुसतें ऐकल्यानेंहि संसाराचा नाश होतो, अविनाशित्व वळेंच अंगीं लागतें; जन्ममृत्यूंची भाषा निःशेष हरपून जाते, आत व बाहेर महासुख वाढूंच लागतें

आणि वर देवाचें सान्निध्य घडतें व त्याचे आनंदपूर्ण गोड शब्द ऐकावयास मिळतात !" (ज्ञा., १०, १९२-२०० ) साधकास मिळणाऱ्या आनंदाची ही परिसीमा होय.

## अनुभूतीचे शरीरावर होणारे परिणाम.

साधकास प्राप्त होणाऱ्या परमानंदाची येथवर चर्चा झाली. आतां ईश्वरी साक्षात्काराचे साधकाच्या शरीरावर, मनावर व आचरणावर काय परिणाम होतात याचा विचार केला पाहिजे. या विविध परिणामांचा विचार करीत असतां प्रथम शारीरिक परिणामाची माहिती देणें जरूर आहे. साक्षात्कारी पुरुष देहभाव विसरतो व देहाविषयीं उदासीन राहतो ही गोष्ट लक्षात ठेवणें अवश्य आहे. " आता देह राहो अथवा जावो, मी केवळ आत्माच आहें, दोरीचा साप खोटा आहे, दोरीच खरी आहे. पाण्यावरील तरंग खोटे आहेत, पाणीच सत्य आहे; लहरींच्या रूपानें तें मुळीं जन्मासहि आलें नाहीं व त्या रूपानें तें नाशहि पावणार नाहीं; त्याप्रमाणें आत्मज्ञास आत्मज्ञान बाबतींत शरीराचें आडनांवहि शिल्लक राहत नाहीं व तें केव्हा पडेल याविषयीं तो उदासीन असतो, तेव्हा आतां त्यास कोणत्याहि मार्गाचा शोध करण्याची काय जरूर ? तोच स्वतः मूर्तिमंत अवघा देश व काळ झाल्यावर त्यानें जावयाचें तरी कोठें व केव्हां ? घट फुटला म्हणजे घटाकाश महदाकाशांत मिसळून जातें हें खरें, परंतु, यावरून ' घट फुटण्यापूर्वी त्यांत मुळीं आकाशच नव्हतें ' असें अनुमान निघतें काय ? म्हणून अर्जुना, तूं योगयुक्त हो, म्हणजे तुला त्यामुळें साम्यता सर्वकाळ व सहज प्राप्त होईल; मग वाटेल त्या वेळीं देह जावो अथवा राहो ! तुझें आत्म्याशीं असलेले ऐक्य कधींच विघडणार नाहीं. ( ज्ञा., ८, २४८-५७. )

## नुभूतीचे मनावर परिणाम

शरिराविषयीं अशा प्रकारचें औदासीन्य दीर्घ अभ्यासानेंच योग्यास प्राप्त तें. सद्गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें परमेश्वराचें एकाग्र चित्तानें ध्यान करण्याचा ण्यास दीर्घकाल केल्यानेंच शारीरिक सुखाविषयीं अशा प्रकारचें वैराग्य लाभत. ' भक्तियुक्त अंतःकरणानें परमेश्वराचें स्मरण केल्यामुळें तो सात्विक गुणांनीं अंतर्बाह्य भरून जातो. त्याच्या अहंकाराचा कठीणपणा विरून जातो व त्यास इंद्रिय-विषयांचा विसर पडतो. इंद्रियाची कसमस मोडतो व मनाची घडी हृदयामध्यें पडते. ही ऐक्य-भावना कायम राहील तोंपर्यंत साधकानें आपल्या आसनावरच बसून राहावें, आतां शरीर शरीरास व पवन पवनास संभाळतें; आत्मानंदाचा उत्कर्ष होऊं लागतो व बसतां क्षणींच ध्यानाचें इष्ट फल मिळतें. " ( ज्ञा., ६, १८६-११. ) शरीर ताब्यांत

येताच मन इंद्रियें सहजच ताब्यांत येतात. "अर्जुना, हीं इंद्रियें फार घातक आहेत. कडू असल्यामुळें जीवित वाढविणारें व मृत्यूसहि मागे सारणारें औषध वैरी आहे, असें जीभ म्हणत नाहीं काय? जें खरोखर हितकर असतें तें दुःखकारक आहे असें हीं इंद्रियें नेहमींच भासवितात! जो योगाभ्यास मीं सांगितला त्याचा अभ्यास आसन दृढ ठेवून केला तर कदाचित् या इंद्रियांचा निरोध होऊन तीं तुझ्या कह्यांत येतील. त्यांचा निग्रह करून तीं पूर्ण ताब्यांत आणली, तर मन आपल्यांतच लीन होतें व अंतर्मुख होऊन आपलें आत्म्याशी असलेलें ऐक्य पाहतें. हा अनुभव प्राप्त झाला कीं, साधक तत्क्षणीं आत्मसुखाच्या साम्राज्यावर आरूढ होतो व आत्म्याशीं एकरूप होऊन त्यांत विरून जातो.'


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल [illegible]
८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# शुद्धाचरण हीच मोठेपणाची कसोटी

बहुत झालासी चतुर शहाणा ।
शुद्ध आचरणा चुकों नको ॥
शिखा सूत्र यांचा तोडीं तूं संबंध ।
मग तुज बाध नाहीं नाहीं ॥

उच्च मानलेल्या जातींचा नीच मानलेल्या जातीतील लोकांविषयींचा तिरस्कार, स्वतःच्या श्रेष्ठपणाविषयीं अभिमान, आध्यात्मिक बाबतींतहि ईश्वरसान्निध्याचे उपाय आपणांसच विशेष सुलभ असा रिकामा गर्व, व ह्या सर्व अवगुणांच्या योगें प्राप्त झालेला उच्च मानिलेल्या जातींतील लोकांचा ताठा पाहून अंतःकरण कळवळल्यामुळें साधुवर्य तुकारामबोवा यांनीं वरील उद्गार काढिले असावे. वरील उद्गार काढिल्याला आज तीन शतकें व्हावयास आलीं, तरी तोच प्रकार आपल्या दृष्टोत्पत्तीस येत आहे. ज्ञानप्राप्तीचीं साधनें वाढलीं, विद्यार्जनाची अभिरुचि पसरत चालली, पाश्चात्य विद्येचा थोडाबहुत संस्कार अप्रत्यक्षपणें तरी प्रत्येकाच्या मनावर होऊं लागला, तरी पण नेहमीं जरी नाहीं, तरी प्रसंगविशेषीं वरील वृत्ति अनेकांच्या ठायीं असलेली आपल्या अनुभवास येते. आज वास्तविक स्थिति अशी आहे कीं, ज्या वर्गाला सर्वसाधारण लोक उच्च असें मानितात, त्या वर्गांतील लोकांनीं धर्मसंशोधनाच्या कामीं जितके यत्न केले आहेत त्यापेक्षां ते पाश्चात्य लोकांनीं जास्त केले असून त्यांच्या उद्योगास चांगलें यशहि आलें आहे. वेद हे वरिष्ठ मानलेल्या चार वर्णांसाठींच, इतरांस त्यांचें अध्ययन करण्याचा काय अधिकार नाहीं, ही अविचारी समजूत आमच्यापैकीं बऱ्याच लोकांत अद्याप आहे. त्या बिचाऱ्यांना पाश्चिमात्य लोकांनीं ह्या बाबतींत किती मोठे उद्योग करून वेद व सर्व प्राचीन शास्त्रें सर्व देशांच्या व वर्णांच्या लोकांस कशीं सुलभ करून ठेविलीं आहेत, ह्याचा मागमूसहि नसतो. जुन्या पंथांतील कित्येक लोक वेदांचा अर्थ होत नाहीं व तो करण्याचा प्रयत्न करणें हें मोठें पाप होय. ह्या समजुतीस अद्याप बिलगून आहेत. एकदां एका कॉलेजांतील कनिष्ठ जातीच्या विद्यार्थ्याची व एका शालजोडी शास्त्रीबावांची गांठ पडली असतां, शास्त्रीबोवांस त्या विद्यार्थ्यानें वेदांतील एक ऋचेचा अर्थ विचारला. शास्त्रीबोवांनीं वेदाचा अर्थ होतच नाहीं व तुजसारख्या शूद्रास पढण्याचा अधिकार नाहीं असा जबाब देतांच विद्यार्थ्यानें

आमच्या कॉलेजांतील अमूक अमूक शास्त्री आम्हांस वेदांचा अर्थ करून सांगत असतात. असें सांगतांच त्या शास्त्रीबोवांनी दिलेलें उत्तर बरेंच मजेचें आहे. ते म्हणाले, तुमचे शास्त्री हे कोण आहेत तें मला माहीत नाही. पण ते खरोखरच जर वेदाचा अर्थ आणि तोहि तुजसारख्या शूद्र विद्यार्थ्यास सांगत असले, तर ते त्यांचे वेद आमच्या वेदांपासून अगदीं निराळे असले पाहिजेत. अशाच तऱ्हेचा प्रकार आपण आपल्या नेहमीच्या व्यवहारांत पहात असतो. हिंदुसमाजांत अशा कांहीं जाती आहेत कीं ज्यांना मौंजिबंधनाचा वास्तविक अधिकार नाहीं, असें भिक्षुक वर्गाला वाटत असतें. पण आपली मिन्हाइकी न घालविण्यासाठीं पुराणोक्त मौंजिबंधन म्हणून कांहींतरी प्रयोग करून वेळ मारून नेण्याची वहिवाट भिक्षुकांची आहे. नीच मानलेल्या जातींत विवाहाच्या वेळीं खरीं मंगळाष्टकें न म्हणतां "शांताकारं भुजग शयनं", इत्यादि श्लोकांवर काम चालविणारे भिक्षुक सर्वांस आढळले असले पाहिजेत. अशा सर्व लोकांनीं, म्हणजे ज्यांना आपला जन्म उच्च मानलेल्या जातींत झाला आहे म्हणून गर्व होत असेल, त्यांनीं साधुवर्य तुकाराम-बुवा यांनी वरील अभंगांत केलेला उपदेश विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. आपण सर्व एकाच पित्याचीं लेंकरें आहोंत, उच्च कुलांत अगर उच्च मानलेल्या जातींत जन्म होणें व त्यावर मनुष्याची श्रेष्ठता अवलंबून असणें हा केवळ भ्रम आहे. रक्त, मांस, चर्म, हाडें हीं उच्च मानलेल्या जातींची निरनिराळ्या प्रकारचीं व नीच मानलेल्यांचीं निराळीं असा वास्तविक प्रकार नाहीं. असे विचार मनुष्याच्या मनांत प्रसंगविशेषी येऊं लागले म्हणजे तो मग आपली खरी योग्यता कशावर अवलंबून आहे हें पहात असतो. संपत्तिवान हा खरा थोर नव्हे, बलवान् हाहि खरा थोर नव्हे, ज्ञानसंपन्न हा खरा थोर नव्हे, कुलवान हा खरा थोर नव्हे, तर ज्याचें आचारण शुद्ध आहे, ज्याचें मन शुद्ध आहे, ज्याचें ज्ञान शुद्ध आहे तो खरा धनवान, तो खरा ज्ञानसंपन्न, व तो खरा थोर, हा विचार अशा वेळीं त्याचे मनांत येत असतो.

हें खरें थोरपण प्राप्त करून घ्यावयास बाह्याचारांची फारशी जरूर आहेच असें नाहीं. निदान ज्या बाह्याचारांच्या प्राबल्याच्यायोगें मनुष्यास आपल्या सद-सद्विवेकाच्या सल्ल्याचा त्याग करणें भाग पडतें. ज्यांचा त्याचेवर इतका वचक बसून जातो कीं, एखादी विशेष गोष्ट वाईट आहे असें वाटत असतांहि ती त्यास करणें भाग पडतें, अशा बाह्याचारांची तरी आवश्यकता नसते. तुकारामबावांच्या

शिखा सूत्र तुझा गुंतला अमान ।
तंववरी तूं जाण श्रुतिदास ॥ १ ॥
त्याची तुज कांहीं चुकताचि नीत ।
होसील पतीत नरकवासी ॥ २ ॥
बहुत झालासी चतुर शहाणा ।

शुद्ध आचरणा चुको नको ॥ ३ ॥
शिखा सूत्र यांचा तोडी तूं संबंध ।
मग तुज बाध नाही नाही ॥ ४ ॥

ह्या अभंगाचें तात्पर्य तरी हेंच आहे. सारांश, ज्यांना आपली योग्यता वाढवावयाची असेल–अशी इच्छा प्रत्येकाच्या ठायीं अंशत: तरी असतेच—त्यांनी आपला जन्म उच्च मानलेल्या जातीत झाला आहे म्हणून आपली योग्यता इतरांपेक्षां जास्त आहे अशी आधींच जर त्यांची समजूत झाली असेल तर ती आधीं घालवावी. ही असली घातक समजूत त्यांच्या अवनतीस कारण झाल्यावांचून राहणार नाहीं. त्यांनीं प्रथमत: आपण सर्व सारख्याच योग्यतेचे आहोंत असें मानून आपली योग्यता वाढवावयास किंवा आपणांत मनुष्यपणा आणावयास आपलें आचरण नीति व धर्मदृष्टया अति शुद्ध असण्याची फारच आवश्यकता आहे, हें विसरतां कामा नये. शुद्धाचरणावांचून सर्व व्यर्थ आहे अशी आपल्या मनाची खातरी झाल्यावर मी उच्च व तो नीच, मी पावन झालेला व तो पतित अशी समजूतच रहाणार नाहीं. व आज आपणां सर्वांस तेंच हवें आहे.




## “ साई भक्तांस अमूल्य संधी ”

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळे. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह ( स्टँप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक
**श्री साईलीला मासिक**

# संसारांतील शिक्षक

मानवी जीवनाला वेगवेगळ्या मनुष्यांनी वेगवेगळ्या उपमा दिलेल्या आहेत. कोणी ह्याला युद्धाची उपमा दिली आहे, तर कोणी शर्यतीची दिली आहे. शक्स-पिअरनें ह्याला नाटकाची उपमा दिली आहे. तुकारामबुवांनीं म्हटलें आहे की **" रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥ "** हें युद्ध एक-सारखें चालू असून ह्याला केवळ मृत्यूनेंच खळ पडणार आहे. ह्या तीनहि उपमा आपआपल्या रीतीनें ठीक आहेत, परंतु पूर्णपणे यथार्थ नाहींत. खरोखर पाहिलें असतां हे मानवी जीवित म्हणजे विद्यार्थिवृत्ति आहे. हें जग म्हणजे एक अफाट पाठशाला असून त्यांत आम्ही सर्वजण विद्यार्थी आहों. आम्हांला येथें जें ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचें तें ईश्वरविषयक होय. हें ज्ञान मिळविण्याचा आम्ही सर्वजण प्रयत्न करीत आहों. कोणीं पहिलाच धडा घेतला आहे, तर कोणाची अधिक प्रगति झाली आहे. तरीपण आम्ही सर्वजण नवशिके असून कोणाचीहि विशेष प्रगति झालेली नाही. पुष्कळ वेळां आमचीं मुलें जेव्हां शाळेंतील किंवा कॉलेजचें शिक्षण संपवून एखादी परीक्षा पसार होतात, तेव्हां आपण त्यांचें पुरें झालें असें म्हणतों. त्याचा अर्थ इतकाच असतो की त्याला आपला योगक्षेम चालविण्यास जेवढें ज्ञान पाहिजे व जितकें कलाकौशल्य पाहिजे तितकें त्यानें प्राप्त करून घेतलें. वास्तविक पहातां शिक्षण केव्हांहि संपत नाहीं. ईश्वरविषयक ज्ञानाला तर अंत नाहीं. हें ज्ञान आम्हांला ह्या जगांत आहों तोंपर्यंत एकसारखें प्राप्त करून घेतलें पाहिजे. तें न करणें म्हणजे आध्यात्मिक मृत्यु होय. शिक्षण ह्या शब्दाचा अर्थ प्रगति होय. आपली आध्यात्मिक प्रगति एकसारखी करीत असणें हें आमचें कर्तव्य आहे.

पण ही प्रगति व्हावी कशी ? कोणत्याहि ज्ञानांत प्रगति व्हावयास मनाची एकाग्रता पाहिजे व ज्ञानार्जनाचें काम एकसारखें झालें पाहिजे. आम्हीं श्वासो-च्छ्वासाखेरीज एकसारखें कांहीच करत नाहीं. विचार करावयाचा तर थोडा वेळ. वाचावयाचें तरी तसेंच. सत्कृत्यें करणेंदेखील त्याचप्रमाणें. इतकेंच नव्हे तर आम्हांला ज्या गोष्टी अत्यंत प्रिय, म्हणजे खाणेंपिणें, सुखोपभोग घेणे वगैरे त्याहि आम्ही साशंक वृत्तीनेंच करतों. तुकारामबुवांनीं म्हटल्याप्रमाणे हें मन अत्यंत चपळ असून क्षणभरहि स्थिर रहात नाहीं. आमची प्रगति तर झाली पाहिजे पण प्रग-तीचा मार्ग तर मोकळा दिसत नाहीं मग हें कार्य व्हावें कसें ?

अशी जेव्हां स्थिति प्राप्त होते तेव्हां धर्मकार्यांत मन रमविणें हेंच श्रेयस्कर वाटतें. धर्मकार्यें करण्यामध्यें रत राहिल्यानें मनाची एकाग्रता राहून ईश्वरविषयक ज्ञानाची वाढ होईल असें वाटून आपण त्याप्रमाणें करतोंहि. पण नेहमीं अनुभव

असा येतो की अशा रीतीनें केलीं जाणारीं धर्मकृत्यें हींच धर्माची व देवाची जागा बळकावतात. मुख्य हेतु बाजूला राहून त्यांचेंच बाह्य व शुष्क स्वरूप महत्त्वाचें होऊन राहातें. बाह्य कृत्यांना महत्व मिळालें म्हणजे कर्मठपणाची वाढ होते व त्यामुळें दंभाला ऊत येतो. बुद्धधर्माचा जन्म झाला तेव्हां ह्या तऱ्हेच्या दंभाचा अतिरेक झाला होता. ब्राह्मसमाजाच्या स्थापनेच्या वेळीं कांहींसा असाच प्रकार झाला होता. तेव्हां केवळ धर्मकृत्यें करीत राहिल्यानें इष्ट कार्य तडीस जाईलच असें नसून, तें साध्य व्हावयाला दुसऱ्याहि कित्येक उपयांची योजना केली पाहिजे. ईश्वरी ज्ञान अगाध असून तें प्राप्त होण्याला फक्त धर्म किंवा धार्मिक कृत्येंच साधन असतील हें संभवनीय नाहीं. तें देणारे अनेक शिक्षक असले पाहिजेत.

ह्याचा अर्थ असा करावयाचा नाहीं कीं, धर्मकृत्यें तुच्छ होत. पण त्याव्यतिरिक्तहि दुसऱ्या साधनांनीं ईश्वराविषयीं ज्ञान प्राप्त होतें. आमचें सारें शिक्षण, आमचा व्यापार उद्योग, आमचीं प्रवासाचीं साधनें म्हणजे आगबोटी व आगगाड्या शास्त्रीय ज्ञान, टेलिग्राफ इत्यादि आपणाला ईश्वराची ओळख करून देत नाहींत काय ? इतकेंच नव्हे तर ज्या ह्या अफाट पृथ्वीवर परमेश्वरानें आम्हांस जन्मास घातलें आहे त्या ह्या पृथ्वीचीं विशालताच परमेश्वराच्या अफाट स्वरूपाचें ज्ञान करून देत नाहीं काय ? ह्या पृथ्वीवरचे पर्वत, त्याच्या शांत व गंभीर स्वरूपाची ओळख करून देतात. पर्वतांतून निघणाऱ्या नद्या देशाला समृद्ध करीत महासागराला मिळतात, त्या देवाच्या कारुण्याची ओळख पटवितात. महासागर त्याच्या रौद्र व गंभीर स्वरूपाची साक्ष देतो. चंद्र, सूर्य व इतर तारका त्याचें वैभव दाखवितात. हीं सर्व त्याच्याविषयीं ज्ञान मिळविण्याचीं साधनें आहेत.

प्राचीन काळीं साधुसंत परमेश्वरप्राप्ति व्हावी म्हणून रानावनांत जाऊन रहात. जगापासून दूर गेल्यानें देव भेटेल व देहदंडानें आत्म्याची उन्नति होईल असें त्यांना वाटे. यहुदी लोकांतील लोकांतील एका साधूनें परमेश्वराचें सान्निध्य कायम रहावें म्हणून चाळीस वर्ष एका उंच स्तंभावर तपश्चर्या केली. तेव्हांच्यापेक्षां हल्लीं जग पुष्कळ पुढें गेलें आहे. आज परमेश्वराचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं व त्याच्या सान्निध्यासाठीं ह्या मार्गाचें अवलंबन करणारे फारसे साधुसंत मिळावयाचे नाहींत.



# भगवद्भक्त कबीरदास

उद्धव आणि शुक यांस भूलोकीं अवतार धारण करण्याची ईश्वरी अनुज्ञा झाली तेव्हां त्या दोघां भक्तांनीं गर्भवास पत्करून जन्म धारण करण्याचें नाकारिलें. भक्ताधीन वैकुंठपतीनें भक्तांचें मानस जाणून त्यांना अयोनीसंभव करण्याकरितां स्वर्गांतून दोन शिंपले भूलोकावर टाकून दिले. त्यापैकीं एक शिंपला चंद्रभागेंत पडून त्यांतून नामदेवमहाराज उत्पन्न झाले, हें नामदेव चरित्रांत सांगितलेंच आहे. दुसरा शिंपला भागीरथींत पडला. त्यामध्यें शुकमहामुनींनीं वास्तव्य केलें असल्याकारणानें त्यांतून एकसारखा रामनामाचा मंजुळ ध्वनी उमटत होता. हा शिंपला प्रवाहामधून वाहात येत असता तो तमाल नावाच्या मोमिनानें उचलून घेतला. त्यानें तो शिंपला उकलला तो त्यांमध्यें स्थित असलेला एक बालक पाहून तो मोमीन आनंदित झाला. कांहीं साधन केलें नसतांना अकस्मात् एखादें निधान सांपडावें त्याप्रमाणें प्रपंच व्यवहारांत दंग असलेल्या मोमिनाला हा दिव्य बालक सांपडतांच त्याला अतिशय आश्चर्य व प्रेम उत्पन्न झालें. तमालानें लागलीच त्या बालकास आपल्या बायकोच्या स्वाधीन केलें. त्याची जन्मवार्ता ऐकतांच त्या तमालकांतेच्या स्तनांतून दुग्ध-धारा वाहूं लागल्या. तमाल मोमिनास एक तान्हें मूल सांपडलें आहे अशी बातमी पसरतांच शेंकडों लोक तें बाळ पाहण्याकरतां गोळा झाले. त्या अर्भकाच्या मुखांतून होत असलेला राम-नामोच्चार ऐकून सर्व लोक आश्चर्यभरित झाले. हा कोणी तरी थोर विष्णुभक्त अविंधवंशांत उत्पन्न झाला आहे असें मानून त्या मुलाचें नांव कबीर असें ठेविलें. तमाल--मोमिनासारख्या जातिहीन मनुष्याच्या पोटीं असा अद्भुत बालक कसा उत्पन्न झाला याबद्दल सर्व लोक साशंक झाले. पण ज्याला अदृष्ट अनुकूल झालें त्याच्या भाग्याबद्दल लोकांना साशंक होण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. प्रारब्धाचा जोर असला म्हणजे विद्या, धन, सामर्थ्य याच्या प्राप्तिकरतां कांहीं एक वशिला लावावा लागत नाहीं किंवा परिश्रम करण्याची जरूर नसते. तमालाचें पूर्व-पुण्य सबळ असल्यामुळेंच शुक-महामुनींनीं अविंधाच्या कुलांत अवतार धारण करून परमेश्वराच्या समतेचें सात्त्विक तत्व सिद्ध करून दाखवलें.

तमालानें कबीराचें लग्नकार्य करून त्याला प्रापंचिक बनविण्याचा यत्न केला, पण कबीराला प्रपंचवृत्ति मानेना. कबीराच्या मनांतून आप-पर हा भाव मुळींच उडून गेला. त्याच्या अंतःकरणांतून समता आणि विषमता यांचें पार उच्चाटन झालें. त्याला रंक व राव सारखेंच दिसूं लागले. ज्या धनाकरितां जगतामध्यें एवढालीं रणें

माजतात. ज्या संपत्ति करितां जिवलग एकमेकांचे जीव घेण्यास तयार होतात. ज्या द्रव्याकरितां मानवी अंतःकरणांत सैतानाचा शिरकाव होऊन असंख्यात घोर कृत्यें घडतात. ज्याच्या सामर्थ्यानेंच दुर्गुणांलाहि सद्गुणांचें स्वरूप प्राप्त होऊन गुणशाली लोकांना खडतर यातना भोगाव्या लागतात त्या द्रव्याला हा तमाल मोमिनाचा भाग्यशाली पुत्र मृत्तिकेपेक्षां अधिक किंमत देत नव्हता, ही गोष्ट मोठी विचार करण्यासाठीं आहे. ज्यांचीं अंतःकरणें विषयसौख्यानें वेडावून गेलीं आहेत अशा प्रापंचिक लोकांत कबीराची निंदा होऊं लागली. कबीराचा नामघोष ऐकून स्वतःच्या पोकळ विद्वत्तेनें भरून गेलेले पंडितमन्य कबीराला मूर्ख समजूं लागले. पण कबीरदास अशा आढ्यता प्रियजनांची कितीशी पर्वा करणार ? केळी आणि बोरी; वेश्या आणि पतिव्रता; राहु आणि चंद्र यांची एके ठिकाणीं नांदणूक सुखानें होणें दुरापास्तच होय. प्रपंचांतील कीटक बनलेल्या अहंमन्य जनांच्या व परमार्थांत वाहून घेतलेल्या कबीराच्या आचार—विचाराचा मेळ पडला तरच आश्चर्य मानावयाचें !

तमाल मोमिनानें कबीराची वृत्ति जाणली होती. आपला मुलगा प्रपंचपराङ्मुख झालासें पाहून तो दुःखित झाला होता तरी तो त्याला आपले धंद्याचें काम करण्याकरितां बसवीच. एके दिवशीं कबीराच्या आईबापांनीं त्याला शेला विणविण्याकरितां मागावर बसविलें. थोडासा शेला विणवतांच कबीराची वृत्ति नामरूपांत जडून जाऊन त्यानें डोळे मिटले आणि विणण्याचें काम बंद पडलें. कबीराचा माग थांबलासें पाहून त्याच्या आईनें येऊन त्याला जागें केलें. तेव्हां कबीर भानावर येऊन आईच्या भीतीनें पुन्हां शेला विणूं लागला. एक हातभर शेला विणून होत आहे तोंच कबीराची पुन्हा विदेहवृत्ति होऊन तो हरिध्यानांत गुंग झाला. आपला भक्त कबीर आपल्या ध्यानात रममाण होऊन राहिल्यानें शेल्याचें काम बंद पडून त्याची आई त्यास शिक्षा करील असें जाणून साक्षात् भगवान शेला विणूं लागले. पद्मासन घालून बसलेल्या योग्यांच्याही ध्यानांत जो लवकर येत नाहीं; श्रुति—शास्त्रें घोकूनही ज्याची कदापि प्राप्ती होत नाहीं; तो शंकराचें प्रियकर—भूषण असा कमळापति ज्याच्या मागावर बसून शेला विणूं लागला, त्या भक्त कबीराचें भाग्य काय वर्णन करावें ! आईच्या माराच्या भयाने कबीर सावध होऊन शेला विणी. कबीराची विदेहावस्था झाली म्हणजे पांडुरंग तें काम पुढें चालवी. अशा रीतीनें तो शेला तयार झाला. कबीरानें शेल्याची घडी घालून तो आपल्या आईला दाखविला. आईनें तो शेला विकण्याकरितां कबीरास बाजारांत पाठवून दिलें.

इतर व्यापाऱ्याबरोबर कबीर आपला शेला विकायास हाटकामध्यें बसला होता तरी त्याचे चित्त रामचिंतनांतच गर्क झालेलें होतें. बाजारांत गिऱ्हाईक पुष्कळ जमलें पण कबीराचा शेला विकत घेण्याला कोणीहि धजेना. जो तो मनुष्य नुसता तो शेला दृष्टीनें पाहूनच निघून जाई. ज्या ज्या मनुष्याला जेवढ्या किंमतीचा शेला घेण्याचं

मानस होत त्याला त्याला तो त्याच्या दुप्पट मोलाचा असा वाटे. कोणालाही त्याची किंमत बरोबर होईना. ज्या शेल्याला देवाधिदेव वैकुंठपतीच्या हस्तांचा स्पर्श झाला त्याचें बरोबर मोल करण्यास भूलोकीं कोणामध्यें सामर्थ्य असणार! सर्व व्यवहारी बाजार आटपून अस्तमानाच्या समयास आपापल्या घरीं निघून गेले तरी कबीरदास आपला शेला पसरून रामरूप होऊन ध्यानस्थ बसला होता. अखेर त्यानें नेत्र उघडले तों बाजार उठलेला पाहून तो मनामध्यें घाबरला. आपला शेला न विकतां घरीं गेलों तर आपली आई आपल्याला चोपील या भीतीनें कबीरदास एका पडक्या व ओस अशा घरांत दडून बसून ईश्वरचिंतन करीत राहिला. एखादी सून सासूच्या भयानें दडून बसते किंवा सर्व कर्मांचा त्याग करून एखादा संन्यासी एकांत मठामध्यें वास्तव्य करितो त्याप्रमाणें संसाराविषयीं पूर्ण उदास असलेला तो कबीर ओस घरांत बसला असतां त्याची सत्यनिष्ठा पाहण्याकरितां त्या ठिकाणीं प्रभु रामचंद्र प्राप्त झाले. यावेळीं त्यांनीं वृद्ध ब्राह्मणाचें सोंग घेतलें होतें. हरिश्चंद्रापाशीं जसा विश्वामित्र प्राप्त झाला किंवा श्रियाळाचें सत्व पाहण्याकरितां शंकर कुश्चळ वेषानें प्रकट झाले, त्याचप्रमाणें कबीरासंनिध येऊन तो वृद्ध व दरिद्री ब्राह्मण कबीरास म्हणाला " हे अति उदार भागवता; मी दीन अनाथ आहें, मी वस्त्ररहित आहे. माझें अंग कुडकुडत असून मला हिंव भरलें आहे. मला पांघरण्याकरितां कांहीं वस्त्र असेल तर दे."

ब्राह्मणाची याचना ऐकून त्या दयाळू भक्तानें अर्धा शेला फाडून त्याला अर्पण केला. तें अर्धवस्त्र घेऊन ब्राह्मण निघून गेला. रामचंद्रांनीं सत्व पाहण्याची पराकाष्ठाच आरंभिली. त्यांनीं पुन्हा फकिराचा वेष धारण केला, आणि ते कबीरापुढें जाऊन उभे राहिले. ज्यानें आपल्या मस्तकावर जटा धारण केल्या आहेत, ज्याच्या हातांत तसबीर आहे, ज्यानें पायांत तोडर घातले आहेत, ज्याचे डोळे विशाळ आहेत असा मलंगवेषी फकीर आपणापुढें उभा राहिलेला पाहून कबीरदास त्याच्याकडे निरखून पाहूं लागला. त्या फकिरानें कबीराजवळ वस्त्राची याचना केली; आणि कबीरास दरडावून तो बोलला "खुदा हा निर्विकार असून तूं त्या निर्गुणाला जाणत नाहींस. तूं त्या खुदाची आठवण सोडून या ठिकाणीं सगुण अशा रामाचें कसलें भजन करितोस!" फकिराचें बोलणें ऐकून कबीरानें भाषण केलें, "निराकार काय आणि साकार काय सर्व एकच आहे. तूप थिजलें असलें किंवा वितळलें असलें तरी ते आपला घृतपणा कधींहि सोडत नाहीं. सुवर्ण आणि अलंकार या न्यायानें अविनाशी असें जें अव्यक्त तेंच आकारास येऊन भक्तकार्याकरितां त्याचा सगुण वेष प्रकट होतो." कबीराचीं वचनें ऐकून फकिरानें तो मुद्दाच सोडून दिला आणि पुन्हा वस्त्राची भिक्षा मागितली. त्याच्या याचनेप्रमाणें कबीरानें राहिलेला अर्धशेला फकिराच्या अंगावर टाकून फकिरास निरोप दिला.

शेल्याची वाट अशाप्रकारें लागल्याबद्दल कबीराचें मन अस्वस्थ झालें काय?

मुळींच नाहीं. वर्षाकाल संपून गेल्यावर आकाश जसें निर्मळ दिसतें त्याप्रमाणें त्या शेल्याच्या अर्ध्या तुकड्याची उपाधि संपल्यामुळें कबीरदास काळजीमुक्त झाल्याबद्दल उलट आनंदच मानूं लागला.

यानंतर रामचंद्रानीं वृद्ध ब्राह्मण वेष धारण केला आणि ते कबीराच्या घरीं गेले. त्यांनीं कबीरमातेला कबीराचा सर्व वृत्तांत निवेदन केला. आपल्या मुलानें शेल्याचे दोन तुकडे करून ते भिकाऱ्यांना वाटून टाकले हें ऐकतांच त्याची माता संतापली. त्या म्हाताऱ्यालाच वाटाडी करून ती क्रोधवश झालेली आई त्या ओस घरांत प्राप्त झाली. एखाद्याला नांगी मारल्यानंतर विंचू जसा दडून बसतो तसा आपला दडून बसलेला अपराधी मुलगा दृष्टीस पडतांच ती मोठ्यानें ओरडली "कारट्या; माझा शेला कोठें आहे तो घेऊन ये अगोदर. नाहीं तर तुझ्या अंगाच्या चिंधड्या करीन."

मातेची क्रोधयुक्त वाणी श्रवण करून तिला उत्तर देण्यास कबीर ठिकाणावरच नव्हता. मानापमानबुद्धि, विषयप्रेम, यांचा त्याग करून आणि देहातीत होऊन कबीर रामभजनांत मन स्थिर करून बसला होता. त्याच्या तोंडून कांहींच उत्तर येत नाहींसें पाहून त्याच्या आईनें त्याला अनेकप्रकारें गालिप्रदान केलें. तरीही कबीर शांतच बसला आहेसें पाहून त्याला शिक्षा करण्याच्या बुद्धीनें ती एखादी काठी पाहूं लागली. इतक्यात बरोबरच्या वृद्ध ब्राह्मणानें लांब उभे राहून तिच्यापुढें एक काठी टाकली. त्या रागावलेल्या बाईनें कबीराच्या पाठीवर जोरानें काठ्या ओढण्यास सुरुवात केली. ज्यानें मनानें सर्वसंग परित्याग केला, ज्यानें पंच-विषयांना पायातळीं घातलें, ज्याला सर्व जगत् ब्रह्ममय दिसूं लागले. ज्याला हरि-चरणावांचून अन्य जगाचा भासही होईनासा झाला त्याच्या नाशवंत शरीरावर तरवारीचे वार केले अगर त्याच्यावर त्याच्यावर रखरखीत निखाऱ्यांचा वर्षाव केला तरी त्याला काय गुमान वाटणार? कबीराच्या मातेनें काठ्यांच्या प्रहारानें कबीराच्या पाठीचें घिरडें केलें तरी तो हरिरूप झालेला भक्त देहावर येईना. त्या भक्तराजाच्या पाठीवर बसणाऱ्या तडाक्यानें तो वृद्ध ब्राह्मण विव्हल होऊं लागला. काठीच्या प्रत्येक आघाताबरोबर तो ब्राह्मणरूपी परमात्मा आरोळ्या मारूं लागला. माराच्या सपाट्यांनीं तो कापूं लागला. सर्व सैन्याचा निःपात झाला म्हणजे तळमळणाऱ्या राजाप्रमाणें तो ब्राह्मण हळूहळू लागला. बालकाचा छळ पाहून जसें मातेचें अंतःकरण तुटतें तद्वत् कबीराची दशा पाहून परमात्मा व्याकुळ झाला. कबीराला मिळणारी सर्व शिक्षा आपणास भोगावी लागत आहे असें जाणून तो वृद्ध ब्राह्मण घाबरून जाऊन कबीरमातेला उद्देशून बोलला.

"मातोश्री, आतां ही शिक्षा पुरी करा. मी बळीला छळावयास गेलों असता जसें माझ्या गळ्यांतच द्वारपाळीचें काम पडलें, त्याप्रमाणें या प्रकरणातलें कपटही मलाच भोगावें लागत आहे. माझे अनंत भक्त झाले; पण या कबीराप्रमाणें मला

मार मात्र कोणी दिला नाहीं. आतां हात थांबवा. माझ्यानें आतां हा चोप सोसवत नाहीं."

ब्राम्हणाच्या तोंडचे उद्गार ऐकून कबीराच्या आईनें प्रहार बंद करून त्याच्याकडे दृष्टि टाकिली तो त्या वृद्ध ब्राम्हणाच्या अंगावर वळ उठले असून त्यांतून रक्त गळत आहे असें पाहून ती अगदीं भाबावून गेली. तिला त्यांतील कांहींच उमज पडेना. तिला फार वेळ साशक ठेवू नये, या विचारानें लागलीच रामचंद्रांनीं विप्रवेश टाकून आपलें सत्यस्वरूप प्रकट केलें. हातांमध्यें धनुष्यबाण घेतलेला आहे. मस्तकावर देदीप्यमान मुकुट शोभतो आहे. आकर्ण नयनांची अपूर्व शोभा दिसत आहे, कर्णांमध्यें अति सोज्वळ कुंडलें चमकत आहेत. गळयामध्यें कौस्तुभ व वैजयंती शोभत आहे, पीतांबराची कास घातली आहे, चरणामध्यें नूपुरें धारण केली आहेत अशा प्रकारचें जानकीवराचें रूप प्रकट होतांच कबीरानें डोळे उघडले. त्या स्वरूपाची कोटिसूर्यासमान शोभा पाहतांच कबीरानें भगवंताच्या चरणास घट्ट मिठी घातली. कबीराला उत्थापन देऊन रामचंद्रांनीं आपल्या पोटाशीं धरिलें आणि सांगितलें. "अमूल्य हिरा असला तरी त्याला आपल्या भांडारांत ठेवण्यापूर्वी सज्ञान नर त्याच्यावर घणाचे घाव मारून त्याची कसोटी पाहातात त्याप्रमाणें तुझी परीक्षा करून मी तुला स्वभांडारांत ठेवलें आहे. आतां तुला मी सदैव स्वतःच्या हृदय--संपुष्टांत ठेवीन." इतकें सांगून देवांनीं कबीराच्या मातेला आलिंगन देऊन म्हटलें. "तूं माझ्या कबीराची माता असल्यामुळें माझ्यानें तुझें भाग्य वर्णवत नाहीं." कबीराचें गान्हाणें सांगण्यास आलेला वृद्ध ब्राम्हण साक्षात् प्रभु रामचंद्र आहे असें समजून येतांच त्या कबीरमातेलाहि गहिंवर दाटला. कबीरासारख्या पुत्रांची माता म्हणवून घेण्यास तिला धन्यता वाटली. पुत्राच्या पुण्याईनेंच आपल्याला रामदर्शन घडलें या आनंदांत तल्लीन होऊन तिनें आपला पुत्र हातांत धरिला आणि श्री रामचंद्र मंगल कारक आशिर्वाद देऊन अदृश्य झाल्यावर ते मातापुत्र स्वगृही निघून गेले.

ज्याला सरस्वती प्रसन्न होते त्याच्याशी पाखंडी लोक वाद घालण्याचें बंद करितात त्याप्रमाणें कबीरावर अयोध्याधीशाची पूर्ण कृपा होतांच त्याच्या मागील आईचा सासुरवास बंद झाला. तीहि हरिभजनांत रंगून राहिली.

कबीराची धर्मपत्नी महान् साध्वी होती. मेघ आणि चपळा किंवा दीप आणि प्रकाशज्योति यांच्याप्रमाणें कबीर आणि त्याची स्त्री यांचें चित्तैक्य होतें. संसार करीत असतां कबीरदास ज्याप्रकारें सुखःदुख समसमान मानी त्याचप्रमाणें त्याच्या कांतेचाही निर्धार तसाच असे. याच पुण्यवान् जोडप्याच्या पोटीं कमाल या नांवाचा मुलगा उत्पन्न झाला. आईबापाच्या सान्निध्याचा संततीवर बराचसा परिणाम घडतो या तत्वास अनुसरून कमालही बापाप्रमाणेंच